अडचणी येत होत्या, मात्र आता या त्रासातून कायमची सुटका झाली असून ती लवकरच लग्न बंधनात अडकणार आहे.

# आरोग्य शिबीरातंर्गत गरजू रुग्णांनी घेतला वैद्यकीय सुविधेचा लाभ

## फुफ्फुस आणि सांध्याच्या विकाराशी लढा देणाऱ्या रुग्णांची लीलावती रुग्णालयात मोफत तपासणी

मुंबई - याकरिता लीलावती हॉस्पिटल्स व मेनाबेन हेल्पिंग हँड्स यांच्या संयुक्त विद्यमाने वंचित रुग्णांसाठी रविवारी मोफत आरोग्य शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. २५० वंचित रुग्णांनी या शिबीराचा लाभ घेतला असून, याठिकाणी तज्ज्ञ डॉक्टरांच्या उपस्थितीत त्यांच्या शंकांचे निरसन करण्यात आले, तसेच यापैकी गरजू रुग्णांवर मोफत शस्त्रक्रिया केली जाणार आहे.

या शिबीरातंर्गत अस्थमा आणि क्रॉनिक ऑब्स्ट्रक्टिव्ह पल्मोनरी डिसीज (सीओपीडी) ग्रस्त रुग्णांची स्पायरोमेट्री तपासणी करण्यात आली, तसेच ऑस्टिओपोरेसिस आणि ऑस्टिओआर्थरायटिससह फोर्स्ड ऑसिलेशन टेक्निक (एफओटी)चा वापर करून बोन मिनरल डेन्सिटी (बीएमडी) चाचणी केली.

प्रतिबंधात्मक उपाययोजना आणि जुनाट आजारांचे वेळीच निदान व व्यवस्थापनाबाबत जागरूकता वाढवण्याकरिता या शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. दमा, क्रॉनिक ऑब्स्ट्रक्टिव्ह पल्मोनरी डिसीज (सीओपीडी), ऑस्टिओपोरेसिस आणि ऑस्टिओआर्थरायटिस या आजारांनी ग्रासलेल्या गरजू रुग्णांना या शिबीरातंर्गत मोफत वैद्यकीय सल्ला देण्यात आला. अस्थमा आणि सीओपीडी तपासणी करण्यात आली. ज्यात स्पायरोमेट्री चाचण्या आणि फोर्स्ड ऑसिलेशन टेक्निक (एफओटी) यांचा समावेश होता. ऑस्टियोपोरोसिस आणि ऑस्टियोआर्थरायटिसचे मूल्यांकन करण्यासाठी, रुग्णांमध्ये हाडांमधील खनिज घनतेची (BMD) तपासणी करण्यात आली.

लीलावती हॉस्पिटलचे वरिष्ठ ऑर्थोपेडिक आणि स्पाइन सर्जन डॉ. अमित कोहली सांगतात की, वृद्धाश्रमातील तसेच कुटुंबीयांनी घराबाहेर सोडून दिलेल्या अशा २५० हून अधिक व्यक्तींची याठिकाणी तपासणी करण्यात आली. यापैकी बऱ्याच व्यक्तींना गुडघ्यांची झीज, नितंब आणि पाठीच्या कण्यातील

वेदनासारख्या मणक्याच्या समस्येमुळे शारीरिक हालचाल न करता येणे यांसारख्या समस्यांना तोंड द्यावे लागत होते. यामुळे त्यांच्या चालण्याच्या क्षमतेवर परिणाम झाला असून, मूत्राशय आणि आतड्यांसंबंधी समस्या देखील आढळून आल्या. या शिबीरातंर्गत तपासणी करण्यात आलेल्या सुमारे २० ते २५ रुग्णांवर मोफत शस्त्रक्रिया केली जाणार आहे.

लीलावती हॉस्पिटलचे वरिष्ठ पल्मोनोलॉजिस्ट डॉ. प्रल्हाद प्रभुदेसाई सांगतात की, याठिकाणी दमा आणि क्रॉनिक ऑब्स्ट्रक्टिव्ह पल्मोनरी डिसीज (सीओपीडी) ग्रस्त रुग्णांना औषधे आणि इनहेलरसह मोफत उपचार पुरविण्यात आले. या शिबीरात सहभाग नोंदविलेल्या रुग्णांपैकी ज्यांना भविष्यात श्वासोच्छ्वासाचा त्रास होईल त्यांच्यावर मोफत उपचार केले जातील.

प्रत्येक रुग्णाला दर्जेदार आरोग्यसेवा उपलब्ध करून देणे हा आमचा मुख्य उद्देश असल्याची प्रतिक्रिया रुग्णालयाच्या विश्वस्त मंडळाकडून व्यक्त करण्यात आली. मेनाबेन हेल्पिंग हँड्स उपक्रमाद्वारे गरजू लोकांपर्यंत पोहोचण्यासाठी आणि वंचित समुदायांना आवश्यक वैद्यकीय सेवा देण्यासाठी रुग्णालय सतत प्रयत्नशील असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. आर्थिकदृष्ट्या कमकुवत रुग्णांना या शिबीराच्या माध्यमातून उत्तमोत्तम सेवा पुरविण्यात आली.